---

## विद्यार्थी विकास विभागाद्वारे विद्यार्थी हितार्थ विविध योजनांसाठी अर्ज सादर करण्याच्या तारखेत मुदतवाढ
## जास्तीतजास्त विद्यार्थ्यांनी लाभ घेण्याचे विद्यापीठाचे आवाहन

अमरावती-

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील व पदव्युत्तर शैक्षणिक विभागातील विद्यार्थ्यांसाठी 'संत गाडगे बाबा कमवा व शिका योजना', 'संत गाडगे बाबा विद्यार्थीनी बस पास सवलत योजना', 'संत गाडगे बाबा शिक्षण संरक्षण योजना' व 'संत गाडगे बाबा शुद्ध पेयजल योजना' आदींसाठी विद्यार्थी विकास विभागाने महाविद्यालयांकडून दि. ३१ ऑगस्ट, २०१८ पर्यंत आवेदनपत्रे मागिविले होते. परंतू गरजू विद्यार्थी योजनांपासून वंचित राहू नये म्हणून कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर यांचे आदेशानुसार विविध योजनांसाठी अर्ज सादर करण्याच्या तारखेला मुदतवाढ देण्यात आली असून ती आता दि. १५ सप्टेंबर, २०१८ करण्यात आली आहे. तसेच 'विद्यार्थी विकास निधी शिष्यवृत्ती योजना', 'स्व.प्रा. रामप्रकाश शामलाल राठी स्मृति शिष्यवृत्ती योजना' व 'संत गाडगे बाबा विद्याधन योजने'ची अंतिम तारीख दि. ३० सप्टेंबर, २०१८ ठेवण्यात आली आहे.

विद्यार्थी विकास विभागाच्या माध्यमातून सुरु असलेल्या विविध योजनांबाबत विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य व विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागांच्या प्रमुखांना विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. रविंद्र सरोदे यांनी पत्र पाठवून कळविले आहे. आवेदनपत्रे ऑनलाईन भरण्याकरिता काही अडचण आल्यास डॉटकॉम इन्फोटेक, अमरावती यांचेशी दूरध्वनी क्र. ७२४९४१९०४० किंवा ९४०३३०३५३५ यावर संपर्क साधावा, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

तरी जास्तीतजास्त विद्यार्थ्यांनी या मुदतवाढीचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी महाविद्यालयांचे प्राचार्य, शैक्षणिक विभागांचे प्रमुख यांचेशी संपर्क साधावा, असे विद्यापीठाच्यावतीने विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक डॉ. रविंद्र सरोदे यांनी कळविले असून काही अडचण असल्यास त्यांचेशी प्रत्यक्ष अथवा दूरध्वनी क्र. ९५०३४५७५४६ वर संपर्क साधता येईल.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै............................. अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. ०४/०९/२०१८.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी